




# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३४ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | रविवार २७ /०९/२०२६ । पाने - १०







# महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

## महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांत कोरडा दुष्काळ जाहीर!



मुंबई (वृत्तसंस्था)

पावसाने सलग दोन महिने मारलेली दडी आणि अल निनोच्या प्रभावामुळे करपून खाक झालेली खरीप पिके या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने बळीराजासाठी अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील तब्बल २६५ तालुक्यांमध्ये अधिकृतरीत्या कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी २६५ तालुक्यांमध्ये केंद्र सरकारच्या निकषानुसार 'ट्रिगर १' लागू झाला असून, याचा थेट अर्थ महाराष्ट्राचा तब्बल ७५ टक्के भूभाग आता दुष्काळग्रस्त म्हणून घोषित झाला आहे.

राज्यात यंदा दुष्काळाची दाहकता खूप मोठी असून शेतकऱ्यांच्या हातात काही पडेल अशी कोणतीही स्थिती राहिलेली नाही, अशी अत्यंत संवेदनशील आणि वास्तववादी कबुली देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच दुष्काळाचा अधिकृत शासन निर्णय जारी करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. या निर्णयामुळे संपूर्ण राज्यात युद्धपातळीवर दुष्काळी सवलती आणि आर्थिक मदतीची यंत्रणा कार्यान्वित होणार आहे.

राज्यातील पावसाची आकडेवारी, पाण्याचा खंड आणि उपग्रहाद्वारे पिकांच्या झालेल्या नुकसानीचा अभ्यास करून हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा अत्यंत कमी पाऊस झाला असून पिकांची स्थिती नाजूक झाली आहे. केंद्र सरकारच्या दुष्काळ संहितेनुसार आवश्यक असलेले निकष या २६५ तालुक्यांमध्ये पूर्ण बसल्याने 'ट्रिगर १' लागू करून कोणतीही दिरंगाई न करता राज्य सरकारने दुष्काळाची थेट घोषणा केली आहे. (पान ७)

# संगमनेरात बाप्पाचे विसर्जन शांततेत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या भक्तिमय सोहळयानंतर अनंत चतुर्दशीच्या दिवशी संगमनेर शहरात गणेश विसर्जन मिरवणुका शांततेत, उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात विविध गणेश मंडळांनी लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप दिला.

संगमनेर शहरातील विसर्जन मिरवणुकीला ग्रामदैवत सोमेश्वर गणपतीच्या उत्थापन पूजेनंतर सकाळी सुरुवात झाली. त्यानंतर शहरातील विविध सार्वजनिक गणेश मंडळे पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकीत सहभागी झाली. ढोल-ताशांचा निनाद, गणेशभक्तांचा उत्साह आणि भक्तिमय वातावरणामुळे शहरातील प्रमुख मार्गांवर उत्सवी वातावरण निर्माण झाले.

विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी नगरपालिका प्रशासन आणि पोलीस यंत्रणेने विशेष नियोजन केले होते. प्रमुख मिरवणूक मार्गांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात आले होते. संवेदनशील ठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. तसेच वाहतूक सुरळीत राहावी आणि भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या.

डीजे व लेझरला निर्बंध ठेवत पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्यात आले. गणेश मंडळांनीही प्रशासनाच्या सूचनांना प्रतिसाद देत शांततेत मिरवणुका काढल्या. ध्वनी प्रदूषण होणार नाही, याचीही काळजी घेण्यात आली. गंगामाई घाटासह शहरातील विविध विसर्जनस्थळी नगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. वीज व्यवस्था, सुरक्षा कर्मचारी, स्वयंसेवक आणि आवश्यक मनुष्यबळ तैनात करण्यात आले होते. एकविरा फाउंडेशन, बजरंग दल, लायन्स क्लब, रोटरी क्लब, विश्व हिंदू परिषद यांसह विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांनीही विसर्जन व्यवस्थेत प्रशासनाला सहकार्य केले.

सार्वजनिक व खासगी गणेश मंडळांच्या विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसह होमगार्ड, एसआरपीएफ, क्यूआरटी आणि साध्या वेशातील पोलिसांची पथकेही तैनात करण्यात आली होती. गणेशभक्तांनीही प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत शांतता, शिस्त आणि पर्यावरणपूरकतेला प्राधान्य दिले. भक्ती आणि उत्साहाचा सुरेख संगम साधत गणरायाला निरोप देण्यात आला.

# दुष्काळाच्या संकटात राजकारणापेक्षा शेतकऱ्यांना आधाराची गरज

## समाजातील सर्व घटकांनी एकत्र येण्याची वेळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्रातील अनेक भागांत निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून, या संकटाचे गांभीर्य लक्षात घेता आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा शेतकरी आणि शेतीला तातडीचा आधार देण्याची गरज निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील काही भागांतील परिस्थिती १९७२च्या दुष्काळापेक्षाही गंभीर ठरू शकते, असे मत व्यक्त केले आहे. लातूर, धाराशिव आणि सोलापूरसह विविध भागांत पाहणी करताना त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला असून, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी राहील, अशी ग्वाही दिली आहे. पावसातील प्रदीर्घ खंडामुळे उभी पिके संकटात आली आहेत. सोयाबीन, कापूस, मका, ज्वारी, भात यांसारख्या पिकांना अनेक भागांत फटका बसल्याचे वृत्त आहे. पाणी, चारा आणि पिकांचे नुकसान या तिन्ही आघाड्यांवर ग्रामीण भागासमोर आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे केवळ दुष्काळ जाहीर करण्याची प्रशासकीय प्रक्रिया महत्त्वाची नसून, त्यानंतर प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांपर्यंत किती वेगाने पोहोचते, हे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. राज्य सरकारने मंत्र्यांना आपापल्या जिल्ह्यांमध्ये प्राथमिक पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले असून, दुष्काळी परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीही स्थापन करण्यात आली आहे. दुष्काळाच्या निकषांनुसार परिस्थितीचे मूल्यांकन करून पुढील निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मात्र, अशा गंभीर परिस्थितीत राज्यातील राजकीय वातावरणही विविध मुद्द्यांमुळे ढवळून निघाले आहे. निवडणुकांची चर्चा, निवडणूक आयोगासंदर्भातील आरोप-प्रत्यारोप आणि त्यातून निर्माण होणारा संभ्रम यामुळे दुष्काळासारख्या मूलभूत प्रश्नाकडे जनतेचे लक्ष विचलित होऊ नये, अशी अपेक्षा आहे. लोकशाहीतील राजकीय प्रक्रिया आणि आरोप-प्रत्यारोप सुरू राहणारच; मात्र शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नावर सर्व राजकीय पक्षांनी आणि सामाजिक संस्थांनी एकत्रित भूमिका घेणे ही काळाची गरज आहे. दुष्काळ हा केवळ शासनाचा प्रश्न नाही. राज्यातील सहकारी साखर कारखाने, सहकारी पतसंस्था, दूध संघ, (पान ७ वर)

## विळद घाटातील वृद्धाश्रमात हल्ला

# दोघांचा मृत्यू, सहा जखमी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगरच्या विळद घाट परिसरातील वृद्धाश्रमात पहाटेच्या सुमारास थरारक आणि धक्कादायक घटना घडली आहे. मातोश्री वृद्धाश्रमात झालेल्या प्राणघातक हल्ल्यात दोन जणांचा मृत्यू झाला असून सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. पहाटे साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास हा हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. नेमका हल्ला कोणी आणि कोणत्या कारणातून केला, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. अहिल्यानगरच्या विळद घाट परिसरातील मातोश्री वृद्धाश्रमात पहाटेच्या सुमारास अचानक झालेल्या हल्ल्याने एकच खळबळ उडाली. अज्ञात कारणावरून झालेल्या या हल्ल्यात दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे, तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.

(पान २ वर)













# संपादकीय...

## बळीराजाच्या घामावर भारताची अर्थव्यवस्था

भारताची ओळख केवळ जगातील मोठी अर्थव्यवस्था म्हणून नाही, तर शेतीप्रधान देश म्हणूनही आहे. हजारो वर्षांपासून या देशाच्या अर्थव्यवस्थेचा, संस्कृतीचा आणि सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू शेती राहिली आहे. आज देश औद्योगिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने प्रगती करत असला, तरी अन्न निर्माण करणारा शेतकरी संकटात असेल तर विकासाची कोणतीही आकडेवारी समाधान देऊ शकत नाही. म्हणूनच आज गरज आहे ती एका मूलभूत प्रश्नाचा विचार करण्याची-शेती टिकली तरच भारत टिकेल, मग शेती आणि शेतकरी टिकवण्यासाठी आपण नेमके काय करत आहोत? आज देशातील शेतकरी अनेक संकटांच्या कचाट्यात सापडला आहे. हवामानातील बदल, अनियमित पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, रोगराई यामुळे शेतीचे गणित दिवसेंदिवस अधिक कठीण होत आहे. एका वर्षी पाऊस कमी पडतो, तर दुसऱ्या वर्षी अवकाळी पाऊस पिके उद्ध्वस्त करतो. उत्पादन खर्च मात्र सातत्याने वाढत आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी, वीज, सिंचन आणि यंत्रसामग्रीचा खर्च वाढत असताना शेतमालाला मिळणारा भाव अनेकदा उत्पादन खर्चाचीही भरपाई करत नाही. शेतकऱ्याची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्याच्या मालाला योग्य आणि हमीचा भाव मिळणे. बाजारात कांदा, सोयाबीन, कापूस, टोमॅटो, दूध किंवा इतर शेतमालाचे भाव कोसळले की त्याचा थेट परिणाम शेतकऱ्याच्या उत्पन्नावर होतो. ग्राहकाला एखादे उत्पादन महाग मिळत असताना त्याच उत्पादनासाठी शेतकऱ्याला मात्र कमी दर मिळतो, ही विसंगती दूर करण्याची आवश्यकता आहे. शेतकरी आणि ग्राहक यांच्या मधील बाजारव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या या अंतराचा फायदा कोणाला होतो, याचाही गंभीरपणे विचार व्हायला हवा. दुसरीकडे, शेतीवरील कर्जाचा बोजा वाढत आहे. पीक हातात येण्यापूर्वीच शेतकऱ्याला अनेक खर्च करावे लागतात. पीक चांगले आले तर बाजारभावाची चिंता आणि पीक खराब झाले तर कर्जफेडीची चिंता, अशा दुहेरी संकटात तो अडकतो. त्यामुळे शेतकऱ्याला केवळ कर्जमाफीच्या घोषणांपेक्षा शाश्वत उत्पन्नाची व्यवस्था देणे अधिक महत्त्वाचे आहे. आज देशात उद्योग, सेवा आणि तंत्रज्ञान क्षेत्र वेगाने विस्तारत आहे. हे आवश्यकही आहे. परंतु आर्थिक विकासाची ही गती शेतीच्या बळावरच टिकणार आहे. शहरातील उद्योगांना मनुष्यबळ, बाजारपेठ आणि ग्राहक मिळतात; परंतु त्या संपूर्ण व्यवस्थेचा आधार अन्नसुरक्षा आहे. अन्नासाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून राहणारा देश आर्थिकदृष्ट्या कितीही बलाढ्य दिसला, तरी त्याची अंतर्गत सुरक्षितता धोक्यात येऊ शकते. म्हणून शेतीकडे केवळ पारंपरिक व्यवसाय म्हणून पाहण्याची मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा धोरणात्मक आधारस्तंभ आहे. आधुनिक तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, सूक्ष्म सिंचन, हवामानाचा अचूक अंदाज, मृदापरीक्षण, सुधारित बियाणे, कृषी प्रक्रिया उद्योग आणि शेतमालाच्या मूल्यवर्धनाला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. शेतकऱ्याने केवळ कच्चा माल विकणारा उत्पादक न राहता मूल्यवर्धित उत्पादन करणारा उद्योजक बनणे आवश्यक आहे. शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग गावाजवळ उभे राहिले, तर रोजगारनिर्मिती होईल आणि शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनाची अधिक किंमत मिळू शकते. फळे, भाजीपाला, दूध, धान्य, मसाले यांसारख्या उत्पादनांच्या प्रक्रिया, पॅकेजिंग आणि निर्यातीला चालना दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळू शकते. यासाठी सहकार क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, दूध संघ, साखर कारखाने आणि कृषी बाजारव्यवस्था यांनी शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून काम केले पाहिजे. शेतकऱ्यांची सामूहिक ताकद वाढली तर बाजारपेठेत त्यांची सौदेबाजीची क्षमता वाढेल. सरकारची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. पीकविमा योजना अधिक पारदर्शक आणि वेगवान करणे, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई वेळेत देणे, सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, शेतीसाठी वीज आणि पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी प्रभावी बाजारव्यवस्था निर्माण करणे आणि शेतकऱ्यांना सुलभ कर्ज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मात्र, ही केवळ सरकारची जबाबदारी नाही. समाजातील उद्योगपती, व्यापारी, सहकारी संस्था, सामाजिक संस्था आणि सक्षम नागरिकांनीही शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सामाजिक जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे. दुष्काळ, अतिवृष्टी किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे ही केवळ मानवतावादी भूमिका नसून ग्रामीण अर्थव्यवस्था टिकवण्याची गरज आहे.

# अॅड. एम. एन. देशमुख महाविद्यालय राजुर येथे महाकुंभ रोजगार मेळावा


युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार क्रांतिकारक राघोजी भांगरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था राजुर उमाजी नाईक औद्योगिक प्रशिक्षण संस्था केळी डॉक्टर गोविंद गारे औद्योगिक प्रशिक्षण संस्था मवेशी अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र अकोले तसेच अकोले महाविद्यालय व अँड.एम एन देशमुख महाविद्यालय राजुर तसेच लोकनेते मधुकरराव पिचड पॉलिटेक्निक कॉलेज अकोले तालुक्यातील सर्व महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने अकोले तालुक्यात भव्य असा महा कुंभ रोजगार मेळावा अँड .एम एन देशमुख महाविद्यालयाच्या प्रांगणात दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजताआयोजित केला आहे त्या अनुषंगाने अकोले तालुका व परिसरातील दहावी पास नापास बारावी पास नापास आयटीआय मधील विविध पॉलिटेक्निक मधील विविध कोर्सेस, कला विज्ञान व वाणिज्य विद्यालयातील पदवी पदविका निरनिराळी कोर्सेस या सर्वांना ज्ञात करण्यात येते की सदर महारोजगार मेळाव्यात अनेक नामांकित अशा कंपन्या व त्यांचे आस्थापना अधिकारी मेळाव्यास हजर राहून संबंधित व त्यांना आवश्यक असलेल्या उमेदवारांची मुलाखत घेऊन लगेच अपॉइंटमेंट लेटर देणार आहेत या अनुषंगाने तालुक्यातील सर्व सुशिक्षित बेरोजगार यांनी सदर मेळाव्यास हजर राहावे आपला रोजगार निश्चित करावा अशी आव्हान संयोजन समितीचे अध्यक्ष माननीय प्राचार्य क्रांतिकारक राघोजी भांगरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था राजुर तसेच अँड एम एन देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर भाऊसाहेब देशमुख ,मवेशी आय टी आय चे प्राचार्य जे.टी. गवळी,राजूर आय टी आय चे प्राचार्य नागरे, अकोले आय टी आय चे प्राचार्य अरुण भालेराव, लोकनेते मधुकरराव पिचड पॉलिटेक्निक चे प्राचार्य अनिल वाकेकर,आनंदगड पॉलिटेक्निक चे प्राचार्य विनोद गिरी,आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज चे समन्वयक प्रा.विद्याचंद्र सातपुते यांनी केले आहे

# विळद घाटातील...

पान १ वरून - या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी आणि पोलिसांचं पथक तातडीने घटनास्थळी दाखल झालं. या प्रकरणात राजू घुले याचं नाव समोर आलं असून, त्याची नेमकी भूमिका काय आहे, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे. या प्रकरणात आरोपीला अटक करण्यात आली आहे. जखमींमध्ये दत्तात्रय शंकर हाडके, मंगलेश्वर बाबुराव हिने, संतोष बिरंगळ, गणेश घोडके, भीमराज फिसके आणि गोरक्षा फुंदे यांचा समावेश असल्याची माहिती देण्यात आली आहे. तसेच साहेबराव भवर आणि बाळासाहेब घाडगे यांच्याबाबतही माहिती समोर आली आहे. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मातोश्री वृद्धाश्रम हा नेता सुभाष तरुण मंडळ ट्रस्टच्या माध्यमातून चालवला जात असल्याची माहिती आहे. या घटनेमागचं नेमकं कारण काय, हल्लेखोर किती होते आणि हल्ल्यात कोणत्या प्रकारच्या शस्त्रांचा वापर झाला, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, दोन जणांचा मृत्यू आणि सहा जण गंभीर जखमी झाल्याने या घटनेचं गांभीर्य वाढलं आहे.

# अकोले ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रमेश भालेराव यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रमेश शंकर भालेराव यांचे शुक्रवार (दि. २५ सप्टेंबर) रोजी रात्री ९ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने अकोले परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

रमेश भालेराव यांनी अकोले ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रात योगदान दिले होते. त्यांच्या निधनामुळे ग्रामस्थ व परिचितांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर शनिवार (दि. २६ सप्टेंबर) रोजी अकोले अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# राजूर पोलिसांचा ब्रास बँडच्या तालावर गणरायाला निरोप



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - प्रतिनिधी राजूर पोलीस स्टेशनच्या गणेशाची मोठ्या उत्सहाच्या वातावरणात विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सदैव जनतेच्या रक्षणासाठी उभे असणारे पोलिसांचे पाय ब्रॉस बँडच्या गाण्यांवर मनसोक्त थिरकताना दिसले.

एरवी नेहमी पोलीस आरोपींच्या गराड्यात असणारे आणि कामाच्या तणावामध्ये आपल्या आनंदाला मुरड घालत नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी कायम तत्पर असणारे पोलीस रुबाबदार फेटा व कुर्ता घालून आनंद घेताना दिसून आले. यावेळी सहकाऱ्यांनी आपले पोलीस आधिकारी किशोर पवार व परसराम तागड यांना अक्षरशः खांद्यावर घेऊन नृत्य केले. यावेळी फेटा आणि

कुर्ता हा पेहराव राजूर शहर वासियांचे आकर्षण ठरत होता. सदैव जनतेच्या रक्षणासाठी उभे असणारे पोलिसांचे माजी सरपंच हेमलता ताई पिचड यांनी स्वागत केले तर विद्यमान विद्यमान आ. डॉ किरण लहामटे यांच्या सुविद्य पत्नी पुष्पाताई लहामटे यांनी स्वागत करून दर्शन घेतले यावेळी राजूरचे सरपंच संतोष बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते सचिन देशमुख, दर्शन ओहारा, यशवंत चोथवे सह व्यापारी ग्रामस्थांनी मिरवणुकीत सहभाग घेत गणरायाच्या निरोपाच्या मिरवणुकीत गाण्यांच्या तालावर सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी ठेका धरला होता. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक परशुराम तागड फौजदार मोरे,पोलीस कॉन्स्टेबल सचिन शिंदे, विजय काळे, सुनील रत्नपारखी, संभाजी सांगळे , सुवर्णा शिंदे, यांच्या सह सर्व कर्मचारी उपस्थित होते.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME TANZILA AQEEL KHAN PATHAN

NEW NAME AS TANZILA AVEZ MOMIN

ADD - MANNAT BUNGLOW, HURAIN NAGAR ,NEAR SAAD BAKERY KOLHEWADI ROAD , SANGAMNER TAL SANGAMNER DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME RAMIJ ALTAF SHAIKH

NEW NAME AS RAMIZ ALTAF SHAIKH

ADD - SAPANA ICE FACTORY , NAIKWAPDURA, SANGAMNER , TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME AWEZ KARIM MOMIN

NEW NAME AS AVEZ KARIM MOMIN

ADD - MANNAT BUNGLOW, HURAIN NAGAR, NEAR SAAD BAKERY KOLHEWADI ROAD , SANGAMNER TAL- SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR

**पाहिजेत**

नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स

वेल्हाळे, ता. संगमनेर

पंचकर्म थेरापिस्ट

पुरूष–१/ स्त्री –१

आकर्षक पगार

9370071777

8806292948

**पाहिजेत**

रिसेप्शनिस्ट - २ जागा

डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा

ओ. टी. टेक्निशियन - २ जागा

डायलिसिस टेक्निशियन - २ जागा

वॉर्ड मॅनेजर - १ जागा

नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा

नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग

कुटे हॉस्पिटल

ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,

8888882225

9766855593

युवावार्ता

जाहीरात छोटी, प्रतिसाद मोठा

**Jijamata English Medium School**

Pavbaki Road Sangamner, CBSE Affiliation No - 1131530

**VACANCIES**

| PARTICULARS | POST | QUALIFICATIONS |
|---|---|---|
| Pre Primary Teachers | 2 | H. Sc., D. T. Ed |
| PRIMARY AND SECONDARY | | |
| English, Marathi, Hindi | 1 | H. Sc., D. T. Ed / B.A. / M.A., B.Ed |
| Maths, EVS, Science | 1 | B.Sc./M.Sc. (Maths / Science) B.Ed. |
| Social Studies | 1 | B.A. / M.A., B.Ed (History & Geography) |
| IT Teacher | 1 | B.C.S. / M.C.S, B.C.A. / M.C.A. |
| Physical Director | 1 | B.A., B.P. Ed |
| Special Educator | 1 | B.A. / M.A., B.Ed. in Special Education or equivalent qualification |
| School Counsellor | 1 | B.A. / M.A. Clinical Psychology / Diploma/certificate in School Couselling |
| Dance Teacher | 1 | Diploma/ Degree in Fine Arts Performing Art or Related Field |
| Music Teacher | 1 | Sangeet Visharad Proficiency in singing & teaching musical instruments |
| Art and Craft Teacher | 1 | A.T.D.C.T.C (Minimum 2 years teaching experience of CBSE / State Board) |

EXCELLENT ENGLISH COMMUNICATION, COMPUTER, AI SKILLS ARE MANDATORY

UNIVERSITY STUDENTS ARE HIGHLY ENCOURAGED TO APPLY!

INTERESTED CANDIDATES CAN CONTACT US

9822304638

shewaletrust@gmail.com

dr.rahulshewale@gmail.com

**आकर्षक पगारावर जागा भरणे आहे**

सुपरवायझर

पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे

शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण

(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)

ऑफिस असिस्टंट

अर्धवेळ [पुरुष / महिला]

शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण

- संपर्क -

उमंग इन्फ्राटेक

7875455777

**पाहिजेत**

तरूणांसाठी सुवर्णसंधी

राजवीर फार्मा

मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त होतकरू, तरूणांनी संपर्क साधावा

पुरूष – ४ जागा

(वय- १८ ते ४०)

रविवार सुट्टी असते

आकर्षक पगार व बोनस

ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर

8669184141

**फ्लॅट विकणे आहे**

- ठिकाण-

दिघी, पुणे, आळंदी रोड, पर्पल ब्लुम सोसायटी, साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108 क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर, 1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी किचन ट्रॉली, बेड, सोफा, टिव्ही युनिट

8379064040

9960984718

**पाहिजेत**

दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा

आकर्षक पगार

बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर

8275191096

**स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत**

अकाऊंटंट मॅनेजर

अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य

Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक

टिम हाताळण्याची क्षमता असावी

पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)

इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा

पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॅार्म्स, धुळवड, ता. सिन्नर

- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084

**पाहिजेत**

रिषभ गोल्ड अँण्ड डायमंड

सल्समन - २

ड्रायव्हर - १

वॉचमेन - १

ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर

9604334777

8669888777

**पाहिजेत**

कॉम्प्युटर ऑपरेटर - ४

अकाऊंटंट - २

सेल्समन - ५

(इन्सेंटीव्ह दिला जाईल)

आकर्षक पगार दिले जाईल

9822097904

9404971697

भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा विकणे आहे**

अतिशय उत्तम लोकेशन तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे (दोन्ही बाजूने रस्ता)

पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर

- संपर्क -

7385653323

**भाड्याने देणे आहे**

सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे

सुकेवाडी रोड, संगमनेर

8282825818

**जागा विकणे आहे**

अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.

एजंट स्वागत

- संपर्क -

9890468212

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५

सफाई कर्मचारी - ५

हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846







आमचे मार्गदर्शक माननीय आमदार
सत्यजित दादा तांबे
वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
-शुभेच्छुक-
ॲड. अमोल चंद्रभान बोऱ्हाडे
जिल्हा संघटक, शिवसेना (उबाठा गट)
श्री. भारत चंद्रभान बोऱ्हाडे
नगरसेवक, संगमनेर नगरपरीषद
साई अर्पण उद्योग समूह । अमोल होम डेकोर प्रा. लि. । अमोल कुशन्स


महाराष्ट्राची शान, युवकांचे प्रेरणास्थान
विधानपरीषद सदस्य
मा.आ.सत्यजित दादा तांबे
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
आकाश प्रमोद पोखरकर
समस्त पोखरकर परिवार
PE ELECTRONICS
पोखरकर इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड फर्निचर मॉल
Godrej interio
गोदरेज फर्निचर फॅक्टरी आऊटलेट
ठिकाण : मालदाड रोड, मार्केटयार्ड समोर, संगमनेर
फोन : 8408047777, 8623043768


नाशिक पदवीधर मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार
मा. आमदार सत्यजित दादा तांबे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
इंजि. संपत
काशिनाथ कांडेकर
सरपंच : ग्रामपंचायत पळसखेडे ता. संगमनेर
साई सिध्दी इंडस्ट्रिज, पळसखेडे


नाशिक पदवीधर मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार
आमदार
सत्यजितदादा
तांबे पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
किरण गुंजाळ
संचालक,
आर्या होल डिग्गर ट्रॅक्टर
शिवाजीराजे गुंजाळ
संचालक, साईगणेशा डेव्हलपर्स
भोळेबाबा पतसंस्था
अनिल गुंजाळ
संचालक, साईगणेशा
डेव्हलपर्स, सामाजिक कार्यकर्ते


नाशिक पदवीधर मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार
मा. आमदार सत्यजित दादा तांबे पा.
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
सह्याद्री बहुजन विद्या
प्रसारक समाज, संगमनेर
संस्था पदाधिकारी, संचालक मंडळ व कर्मचारी वृंद


नाशिक पदवीधर
मतदारसंघाची शान
अवघ्या महाराष्ट्राच्या
कल्याणाची जाण
आमदार
सत्यजीत
तांबे आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक - ॲड. प्रशांत गुंजाळ, संगमनेर, जि. अहिल्यानगर


आमचे मार्गदर्शक माननीय आमदार
सत्यजित दादा तांबे
यांना वाढदिवसानिमित्त खुप खुप शुभेच्छा...!
तसेच
संगमनेर तालुका इंजिनिअर्स
ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स असो. चे अध्यक्ष
नरेंद्र बाळासाहेब पवार
यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा...!
शुभेच्छुक - प्रभाग क्र. ३ मधील
सर्व मित्र परिवार व शुभचिंतक


आमचे मार्गदर्शक, नाशिक पदवीधर
मतदार संघाचे लोकप्रिय आमदार
सत्यजित
तांबे (दादा)
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
श्री. प्रदिप शंकर काशिद
यश चंद्रशेखर काशिद
श्री. आदित्य चंद्रशेखर काशिद
श्री. मानस प्रदिप काशिद
श्री.प्रदिप शंकर काशिद
ग्रामसेवक,
त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक
समस्त काशिद परिवार
संगमनेर, जि. अहिल्यानगर


नाशिक पदवीधर मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार
आपल्या कामगिरीतून अवघ्या महाराष्ट्रात नावाजलेले
सत्यजित
तांबे (दादा)
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
मा.श्री. संजय रामदास पगडाल
उपाध्यक्ष,
पद्मशाली समाज मंडळ,संगमनेर
श्री सिद्धी मल्टीसर्विसेस
मा.सौ.सरोजिनी संजय पगडाल
नगरसेविका, संगमनेर नगरपरिषद
महिला बालकल्याण सभापती
श्री सिद्धी लॅब देवी गल्ली
सर्व पगडाल परिवार, संगमनेर । वॉर्ड क्र. ११ मधील सर्व नागरीक


देशी गीर गायीच्या दुधातील मिठाई
निमाई™
स्वीटस्
क्रीडा, साहित्य, उद्योग, कला या सर्वच क्षेत्रांचा अभ्यास असलेले नेतृत्व
नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार
मा. सत्यजित दादा तांबे
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शाखा क्र. १ - मुख्य शाखा धांदरफळ
शाखा क्र. २ - संगमनेर बस स्थानक । शाखा क्र. ३ - गणेशनगर, संगमनेर
निमाई उद्योग समूह
संचालक: शुभम भास्करराव घुले

# लाडका ददु... समाजसेवेचा ध्यास घेतलेला सत्यजित !



२७ सप्टेंबर १९८३ रोजी सत्यजितचा जन्म झाला. लहानपणापासूनच गोंडस, दाट केसांचा आणि सगळ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेला हा मुलगा गल्लीतल्या प्रत्येकाचा लाडका होता. कुणीही घरी आले की त्याला उचलून घ्यायचे. गल्लीतली छोटी मुले रोज त्याच्याभोवती जमायची आणि त्याला प्रेमाने 'सोनूबाळ' म्हणायची. त्याचे नाव काय ठेवायचे, यावर घरात रोज चर्चा व्हायची. दररोज नवीन नाव सुचायचे.

एक दिवस माझे वडील, ती. भाऊसाहेब थोरात (दादा) घरी आले आणि त्यांनी ठामपणे सांगितले, सोनूबाळ नाही म्हणायचे. आजपासून बाळाचे नाव सत्यजित! आणि त्या दिवसापासून तो आमच्यासाठी सत्यजित झाला. नंतर माझा दुसरा मुलगा डॉ. हर्षलचा जन्म झाला. बोबड्या बोलात तो मोठ्या भावाला 'ददु' म्हणू लागला आणि मग माझ्यासाठीही तो 'ददु'च झाला. अर्थात, सर्वांसमोर मी त्याला सत्यजितच म्हणते; मात्र घरातला हा 'ददु' आजही तितकाच जवळचा आहे.

लहानपणापासूनच सत्यजित अभ्यासात हुशार. वर्गात नेहमी पुढे, शिष्यवृत्ती मिळविणारा आणि अभ्यासाबरोबरच इतर उपक्रमांमध्येही उत्साहाने सहभागी होणारा. महाविद्यालयीन जीवनात तो मित्रपरिवारात लोकप्रिय झाला आणि त्यातूनच त्याचा सामाजिक व सार्वजनिक जीवनाकडे पाहण्याचा प्रवास सुरू झाला. युवक काँग्रेसच्या माध्यमातून त्याने सार्वजनिक कार्याला सुरुवात केली.

डॉ. सुधीर तांबे एम.एस. जनरल सर्जन असल्याने आम्ही संगमनेरच्या एस.टी. स्टँडजवळ हॉस्पिटल बांधले आणि वरच्या मजल्यावर राहण्याची सोय केली. डॉक्टर तांबे यांची प्रॅक्टिस चांगली होती. उत्तम सर्जन म्हणून त्यांची ख्याती होती. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये रुग्णांची नेहमीच गर्दी असायची.

दोन्ही मुले लहानपणापासूनच रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या संपर्कात येत. ग्रामीण भागातून आलेल्या रुग्णांची परिस्थिती ते जवळून पाहत. त्या काळात आजच्यासारख्या हॉटेलच्या सुविधा नव्हत्या. कोणी उपाशी असल्याचे समजले की सत्यजित स्वतःहून त्याला जेवण देऊन यायचा. एखाद्या रुग्णाच्या नातेवाईकाला काही अडचण आहे का, हे विचारायचा. हॉस्पिटलमधील कंपाउंडर जेवायला बसले की त्यांच्यात जाऊन बसायचा. या छोट्या-छोट्या कृतींतून तो कधी संस्कारित होत गेला, हे आम्हालाही कळले नाही. लहानपणापासूनच त्याला वाचनाची आवड होती. स्वतःच्या नावाचा शिक्का बनवून आणला होता. छोटी-छोटी पुस्तके विकत आणायची आणि त्यावर स्वतःचा शिक्का मारून ठेवायचा. त्याच्यामुळे हर्षललाही वाचनाची आवड लागली. आजही आमच्या घरात पुस्तके नेहमीच दिसतात.

सत्यजितला नीटनेटकेपणाची आणि शिस्तीचीही लहानपणापासूनच आवड. सॉक्स-शूज घालून व्यवस्थित राहणे, स्वतःची कामे स्वतः करणे याकडे त्याचा कटाक्ष असे. सायकलिंग, क्रिकेट आणि इतर खेळांमध्येही तो उत्साहाने सहभागी व्हायचा. सत्यजित पाचवीत आणि हर्षल चौथीत असताना डॉ. तांबे यांनी दोघांना कुलू-मनाली येथे ट्रेकिंगला पाठविले होते. पंधरा दिवसांच्या त्या प्रवासात देशाच्या विविध भागांतून आलेली मुले होती. प्रसिद्ध लेखक राजा मंगळवेढेकर मुलांना गोष्टी सांगण्यासाठी सोबत होते. एका तरुण डॉक्टरचीही सोबत होती. त्या प्रवासात कुणी आजारी पडले की सत्यजित त्यांना औषध देऊन बरे करायचा. लहानपणापासून वडिलांसोबत ओपीडीत बसल्यामुळे औषधांची त्याला माहिती होती. त्याची ही उपजत निरीक्षणशक्ती आणि हुशारी आम्हाला तेव्हापासूनच जाणवत होती.



डॉ. तांबे मुलांसाठी निवासी शिबिरेही घेत. त्यातून अक्षर, वक्तृत्व आणि इतर कौशल्यांचा विकास व्हायचा. सत्यजित आणि हर्षलचे अक्षर आजही मराठी-इंग्रजी टाईप केल्यासारखे सुंदर आहे. चौथी-पाचवीत असतानाच सत्यजित वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घ्यायचा. स्वतः भाषण तयार करायचा आणि कधी कधी एकटाच एस.टी.ने स्पर्धेला जायचा.

आजही त्याच्या व्यक्तिमत्त्वात तीच स्वयंशिस्त दिसते. डॉ. सुधीर तांबे आमच्या कुटुंबाचे हेडमास्टर होते आणि आहेत; पण आता आमच्या कुटुंबाचा सत्यजित हा हेडमास्टर झाला आहे! अंगणापासून खोलीपर्यंत सर्व काही व्यवस्थित असावे, याकडे त्याचे लक्ष असते. काही अव्यवस्थित दिसले की तो लगेच सूचना करतो.

स्वतःची कामे स्वतः करण्याची त्याला सवय आहे. बॅग भरण्यापासून कपडे धुण्यास देणे, वेळ मिळेल तेव्हा कपडे इस्त्री करणे-प्रत्येक गोष्टीत त्याची स्वयंशिस्त दिसते. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची, घरातील मदतनीसांची, पी.ए. आणि ड्रायव्हरचीही तो मनापासून काळजी घेतो. त्याला कुत्र्यांबद्दल विशेष प्रेम आहे. होप आणि जॉय हे आमच्या घरातील दोन डॉग त्याच्यासाठी कुटुंबातील सदस्यच आहेत. कुठूनही आला की आधी त्यांच्याशी खेळणार. त्यांचे लसीकरण, जेवण आणि औषधे याचीही तो स्वतः काळजी घेतो.

स्वभावाने अतिशय मवाळ; मात्र कामाच्या बाबतीत कमालीचा तत्पर. एखादे काम हातात घेतले की त्याचा पाठपुरावा करून ते पूर्ण करण्याचा त्याचा स्वभाव आहे. निर्णयक्षमता चांगली आहे. भारतभर, महाराष्ट्रभर आणि जगभर त्याचा मित्रपरिवार आहे. युवक काँग्रेस आणि जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून त्याने असंख्य मित्र जोडले आहेत. जीवाला जीव देणारे मित्र हे त्याच्या आयुष्याचे मोठे भांडवल आहे.

त्याचे बोलणे नेहमी मुद्देसूद असते. मी कधी जास्त बोलायला लागले तर तो लगेच म्हणतो, मुद्द्याचं बोल! त्याच्या या स्वभावावर घरात अनेकदा हसू येते; पण त्याच्या कामाच्या पद्धतीतही हीच स्पष्टता दिसते. इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर करून त्याने 'सिटिझन विल' हे पुस्तक प्रकाशित केले. कोविडच्या काळात शेतीकडे लक्ष देतानाच डोंगरावर दंडकारण्य अभियानाचे काम केले. त्या डोंगराला माझे बंधू आमदार बाळासाहेब थोरात आणि डॉ. सुधीर तांबे यांनी 'हर्मन हिल्स' हे नाव दिले. कोविडच्या कठीण काळात रुग्णांना बेड मिळवून देणे, औषधांची व्यवस्था करणे आणि गरजू नागरिकांना मदत करणे या कामात सत्यजित आणि हर्षल दोघांनीही मोठे योगदान दिले.

सत्यजितचे व्यक्तिमत्त्व खरोखरच अष्टपैलू आहे. सामाजिक काम, राजकीय क्षेत्र, वाचन, लेखन, पर्यावरण, शेती आणि मित्रपरिवार अशा अनेक क्षेत्रांत तो सातत्याने सक्रिय आहे. जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून सामाजिक कार्याची परंपरा पुढे नेताना त्याने सामुदायिक विवाहाच्या उपक्रमातही सहभाग घेतला. २०११ मध्ये १२१ जोडप्यांच्या सामुदायिक विवाह सोहळ्यात त्याचा स्वतःचा विवाह डॉ. मैथिलीशी झाला. मैथिलीही तितकीच कष्टाळू आणि कामाचा उरक असणारी. ड्रायव्हिंग, स्वयंपाक, घराचे व्यवस्थापन, शाळा-ऑफिसची जबाबदारी आणि अहिल्या-सूर्याला सांभाळणे, हे ती समर्थपणे करते. त्यामुळे सत्यजितला सामाजिक कामासाठी अधिक वेळ देता येतो.

आज २७ सप्टेंबर २०२६. माझ्या 'ददु'चा वाढदिवस. त्याला वाढदिवस साजरा करायला फारसा आवडत नाही. त्याच्यासाठी वाढदिवस म्हणजे केवळ केक कापण्याचा दिवस नाही, तर समाजासाठी काहीतरी करण्याचा दिवस आहे. त्यामुळे यंदाही त्याच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमाला प्राधान्य देण्याची त्याचीच इच्छा आहे.

लहानपणी गल्लीत सगळ्यांचा लाडका असलेला 'सोनूबाळ', दादांनी दिलेल्या नावाने 'सत्यजित' झाला आणि आज हजारो लोकांशी जोडलेला 'ददु' झाला आहे. त्याच्या आयुष्याचा प्रवास पाहताना आई म्हणून समाधान वाटते. तुझ्या भावी आयुष्यात तुझ्या हातून समाजाची अधिकाधिक सेवा घडो. तुझ्या विचारांना, कामाला आणि स्वप्नांना अधिक बळ मिळो. तुझ्या माध्यमातून असंख्य माणसांच्या आयुष्यात आनंद आणि आशा निर्माण होवो, हीच आई म्हणून मनापासून सदिच्छा.

**सौ.दुर्गा सुधीर तांबे**
अध्यक्षा, जयहिंद महिला मंच,
मा. नगराध्यक्षा, संगमनेर, नगरपरिषद, संगमनेर.
मो.नं. ९८२२५५३२५४.





# व्हिजनरी लिडर - सत्यजित तांबे

## आ. तांबे यांनी सुदृढ समाज निर्मितीसाठी काम करावे

देशाच्या सर्वांगीण प्रगती करता सर्व क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय क्षेत्रात चांगल्या प्रतिनिधीची गरज असते. दूरदृष्टी, बौद्धिक क्षमता, कामाचा मोठा आवाका, प्रभावी वक्तृत्व,विविध विषयांची अभ्यासपूर्ण मांडणी, अत्याधुनिक व्यवस्थापन आणि प्रशासनाची सांगड घालून समाजाला पुढे घेऊन जाणाऱ्या नेतृत्वामध्ये आज सत्यजित तांबे यांचा राज्यातील अत्यंत प्रमुख महत्त्वाच्या नावांमध्ये समावेश आहे.

खरे तर लहानपणापासूनच सत्यजित , हर्षल , करण हे हुशार होते. तिघेही आपल्या वर्गामध्ये पहिले यायचे.माझी इच्छा होती की सत्यजित यांनी डॉक्टर व्हावे किंवा अकॅडमीक मध्ये आपले करिअर करावे.मात्र लहानपणापासूनच त्याला समाजकार्याची मोठी आवड असल्याने सामाजिक क्षेत्रामध्ये स्वतंत्र असे आपले मोठे वलय तयार केले आहे.

२००४ मध्ये मी काँग्रेस पक्षाकडून लोकसभेच्या जागेसाठी मागणी केली यावेळी अत्यंत लहान वयामध्ये संगणकावर त्यांनी छान मांडणी करून माझ्या राजकीय व सामाजिक कार्याची आढावा पुस्तिका तयार केली. व्यवस्थापन शास्त्रामध्ये तो कायम अपडेट असतो. सरळधोपट विचार न करता सातत्याने नवीन आणि वेगळा विचार करून तो अंमलबजावणी करत असतो. जगभरातील नामांकित हॉवर्ड विद्यापीठातून तरुणांचे व्हिजन कसे असावे याबाबत यंग लीडरशिपचा अभ्यासक्रमाही त्याने पूर्ण केला. याचबरोबर न्यूयॉर्क शहराचे मेयर ग्यावीन न्युसमयांच्या सिटीजन विल या शहरांच्या विकासाची आधुनिक मांडणी आणि नागरिकांचा सहभाग या बाबतचे तरुण व राजकीय नेतृत्वासाठी मार्गदर्शक ठरावे असे या पुस्तकाचे मराठी भाषांतर केले.

राजकारण समाजकारणाबरोबर आणि या सर्व धावपळीत सुद्धा तो इकॉनॉमिक्स, मॅनेजमेंट, आणि लॉ चा सुद्धा अभ्यास करत आहे. सत्यजित हे सातत्याने वाचन व चिंतन करत असतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे आपले मतप्रदर्शन तो करत असतो. विशेषता उद्योग,शिक्षण आणि आरोग्य यावर केलेली मांडणी लोकांना खूप आवडते त्यामुळे राज्यभरात त्याचे मोठे चाहते आहेत जिकडे जाईल तिकडे त्याच्याभोवती मोठा गराडा पडतो. युवकांबरोबरच सीनियर सिटीजन सुद्धा त्याच्या या कामाबाबत अत्यंत आनंदी आणि समाधानी आहेत.प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास, प्रभावी वक्तृत्व,यामुळे त्यांचे राज्यभरात लाखो चाहते आहेत.

तो युवक काँग्रेसचा अध्यक्ष असताना शिरपूर मध्ये आदिवासी मुलांबरोबर त्याने संवाद साधला आणि दुसऱ्या दिवशी सकाळीच मला ज्येष्ठ नेते अमरीश भाई पटेल यांचा फोन आला. की सत्यजित तांबे यांनी अत्यंत प्रभावीपणे आदिवासी युवकांशी संवाद साधून मांडणी केली आहे. खरे तर त्याला लवकर राजकीय संधी मिळाली पाहिजे. याचबरोबर अनेकांनी मागणी केली की त्यांच्या मध्ये खूप मोठी क्षमता आहे आणि म्हणून त्याला राजकीय संधी मिळाली याकरता मी पदवीधर निवडणुकीमध्ये माझ्या ऐवजी त्यांना संधी दिली.

या संधीचे सोने करताना विधान मंडळाचे मोठे व्यासपीठ त्यांना मिळाले. विकासाची दूरदृष्टी नवनवीन गोष्टी शिकण्याची पद्धत अभ्यासपूर्ण मांडणी यामुळे विधान परिषदेत अनेक प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडले. तरुणांच्या रोजगाराच्या बाबत तो सातत्याने आग्रही आहे. इंडियाबुल्स प्रश्न, नाशिक पुणे रेल्वे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, जैन साधूंच्या पायी चालण्याच्या सुरक्षिततेच्या प्रश्न, युवकांना सर्व सुविधा एकाच ठिकाणी मिळावा याकरता इनोवेशन सेंटर सुरू करण्याबाबत आग्रह, शिक्षकांचे प्रश्न, पदवीधरांचे प्रश्न हे प्रश्न मांडून त्याचा मोठा पाठपुरावा तो करत आहे.

विकासाची दृष्टी, राजकारण, अर्थकारण आणि सर्वांना सोबत घेऊन सातत्याने काम करत असतो. अशा व्यस्त जीवनात त्याच्यामध्ये असलेल्या कलावंताला तो वाव देतो. निसर्ग सौंदर्याची मोठी जाणही त्यांना आहे. जे काम करायचे ते मनापासून आणि अत्यंत पूर्ण कार्यक्षमतेने आणि प्रामाणिकपणे करायचे की त्याची कार्यपद्धती आहे. विद्यार्थी दशेत एनएसयुआय, विविध युवक संघटना याचबरोबर युवक काँग्रेसच्या माध्यमातून झोकून देऊन त्यांनी काम केले. राज्यभर मोठा मित्रपरिवार उभा केला. तो कायम सगळ्यांच्या संपर्कात असतो. मित्र परिवाराच्या अडचणीत सर्वांच्या पाठीशी ठामपणे उभा राहतो. आणि म्हणून राजकारण विरहित त्याची जीवाभावाचे अनेक सहकारी आहेत. हेच त्यांचे खरे भांडवल आहे. देशभरात मोठा संपर्क असल्याने त्याच्या खूप विविध क्षेत्रातील मान्यवरांशी ओळखी आहेत. या ओळखींचा उपयोग कोरोना संकट काळात नागरिकांना इतरत्र पोहोचवण्यासाठी मदत करण्यासाठी त्यांनी केला. या काळात मदतीचे अहोरात्र काम केले. याचबरोबर लॉकडाऊन काळामध्ये आमच्या कोळवाडे येथील डोंगरावर वृक्षारोपणासाठी मोठे काम करून फादर हर्मन बाकर यांच्या स्मरणार्थ हार्मन हिल उभी केली.





जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून मी सामुदायिक विवाह सोहळे सुरू केले यामध्ये गरीब श्रीमंत भेद राहू नये म्हणून सत्यजित ने सामुदायिक विवाह सोहळा करावा ही सूचना करताच त्यांनी ती अत्यंत मोठ्या मनाने मान्य केली.नातेवाईक, कुटुंब ,सहकारी, मित्रपरिवार या सर्वांच्या मध्ये तो अगदी चांगला रमतो. मुलगी अहिल्या हिच्या समवेतचे त्याचे वडील म्हणून नाते अत्यंत कौतुकास्पद आहे. छोट्या अहिल्याशी सातत्याने त्यांचा संवाद असतो.

साहित्य, कला, क्रीडा, समाजकारण, राजकारण, सहकार या सर्व विषयांची अभिरुची आहे.तरुणांसाठी रोजगार निर्मिती व त्याचा भर आहे, अर्थव्यवस्था मॅनेजमेंट या विषयाच्या तो सातत्याने अभ्यास करत असून तरुणांना यामधून प्रोत्साहित करत असतो. अवघ्या दीड वर्षाच्या काळामध्ये आपल्या पूर्ण मतदारसंघात त्याने ५० अभ्यासिका निर्माण केल्या आहेत. सत्ताधारी ,विरोधक, यापेक्षा रचनात्मक कामाला त्याने कायम प्राधान्य देऊन समाजकारण केले आहे. देशाची प्रगती, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे महत्त्व याबाबत कायम अत्यंत परखड मत तो व्यक्त करत असतो. मायक्रोचीपबाबत भारताने पुढाकार घ्यावा याबाबत त्याने प्रथमता मत मांडले. हा अत्यंत मोठा विषय होता. सोशल मीडियाच नव्हे तर प्रत्यक्ष कामातून अत्यंत मोठा गोतावळा निर्माण करणाऱ्या सत्यजित ने आज राज्यपातळीवर समाजकारणातून आपला मोठा ठसा उमटवला आहे. परंतु आज देशातील राजकारण एका वेगळ्या उंबरठ्यावर येऊन ठेवले आहेत अशा वेळेस तरुणांना संघटित करून हा समाज बदलण्यासाठी व त्यांना योग्य दिशा देण्यासाठी पारंपारिक पद्धतीच्या राजकारणापेक्षा अत्याधुनिक व्यवस्थापन शास्त्राने राजकारण करून या देशातील तरुणांना योग्य दिशा देऊन सदृढ समाज निर्माण करावा ही माझीच नव्हे तर आपल्या सर्वांची अपेक्षा आहे. आणि सत्यजित तांबे हे नक्की पूर्ण करतील असा मला विश्वास आहे.



**मा. आ. डॉ. सुधीर तांबे**
संस्थापक, जयहिंद लोकचळवळ
मा. आ. विधान परिषद, मुंबई

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# एकविराच्या ४५० स्वयंसेवकांची गणेश विसर्जनात सेवा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देत गणेश विसर्जनाच्या दिवशी एकविरा फाउंडेशनच्या ४५० युवक-युवतींनी संगमनेर शहरात सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांना मोठी मदत केली. प्रवरा नदीकाठासह विविध विसर्जनस्थळी कार्यरत राहत या स्वयंसेवकांनी गणेशभक्तांना सुरक्षित विसर्जनासाठी मार्गदर्शन करण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात निर्माल्य संकलित करून परिसराची स्वच्छताही केली.



गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर एकविरा फाउंडेशनच्या वतीने प्रवरा नदीकाठावरील गंगामाई घाट, म्हाळुंगी नदीकाठ आणि शहरातील विविध विसर्जनस्थळी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. ५०-५० युवक-युवतींच्या गटांमध्ये स्वयंसेवक उभे राहून गणेशभक्तांना विसर्जनासाठी आवश्यक माहिती देत होते. नदीकाठावरील पाण्याची खोली आणि सुरक्षिततेबाबत नागरिकांना मार्गदर्शन करत निर्माल्य नदीत न टाकता संकलन केंद्रात देण्याचे आवाहनही करण्यात आले.

एकविरा फाउंडेशनच्या ४५० युवक-युवतींनी विसर्जन मिरवणुकीदरम्यान नागरिकांना सहकार्य करताना नदीकाठावर पडलेले निर्माल्य गोळा केले. विसर्जनानंतर परिसरात निर्माण होणारी अस्वच्छता आणि त्यातून उद्भवणारी रोगराई टाळण्यासाठी स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहीम राबवली. पर्यावरण संवर्धन आणि आरोग्याचा संदेश देत फाउंडेशनच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले. सुरक्षित गणेश विसर्जनासाठी एकविरा फाउंडेशनच्या वतीने नदीकाठी सुरक्षारक्षक, पोहणारे युवक आणि स्वयंसेवकांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच भाविकांसाठी आरती व इतर आवश्यक सुविधांचीही व्यवस्था करण्यात आली. प्रवरा नदीकाठावरील खोल पाण्यामुळे कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात आली.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्याने यांत्रिक कन्वेअरची व्यवस्था करण्यात आली होती. या माध्यमातून नागरिकांना नदीत खोलवर न जाता सुरक्षित पद्धतीने गणेशमूर्तींचे विसर्जन करता आले. त्यामुळे विसर्जनस्थळी होणारी गर्दी कमी होण्यास आणि दुर्घटना टाळण्यास मदत झाली.

एकविरा फाउंडेशनकडून मागील सात वर्षांपासून गणेश विसर्जनाच्या काळात नागरिकांना मदत आणि निर्माल्य संकलनाचा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने युवक-युवती स्वयंस्फूर्तीने या उपक्रमात सहभागी होत असून, यंदाही ४५० स्वयंसेवकांनी विविध ठिकाणी सेवा बजावली.

दरम्यान, प्रवरा नदीकाठाबरोबरच जाणता राजा मैदानावर तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावातही नागरिकांनी गणेश विसर्जन केले. या ठिकाणीही स्वयंसेवकांनी नागरिकांना सहकार्य केले.

# २८ ते ३० सप्टेंबर बँकांचा 3 दिवस संप

## रविवार २७ सप्टेंबरला बँका सुरू

मुंबई (वृत्तसंस्था)

पाच दिवसांचा आठवडा जाहीर करणे, 'कामगिरीवर आधारित प्रोत्साहन' योजना मागे घेणे या प्रमुख मागण्यासह विविध मागण्यांसाठी बँकांनी तीन दिवसाचा देशव्यापी संप जाहीर केला आहे. येत्या २८ ते ३० सप्टेंबर रोजी हा देशव्यापी संप होणार असून सार्वजनिक क्षेत्रातील 'स्टेट बँक ऑफ इंडिया' आणि 'इंडियन बँक' यांनी ग्राहकांना सूचना जारी केली आहे. त्यामुळे ग्राहकांनी आपली कामे २८ तारखेच्या आधीच पूर्ण करावीत अशी आवाहन करण्यात येत आहे.२६ सप्टेंबर रोजी चौथा शनिवार असल्याने आणि त्या दिवशी बँकेची सुट्टी आहे. या सलग सुट्ट्यांच्या काळात बँकिंग सेवांवर परिणाम होऊ शकतो.

मात्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांना २७ सप्टेंबर या रविवारी नेहमीप्रमाणे कामकाज करण्याची परवानगी दिली आहे; त्यानुसार बँकांच्या सर्व शाखा, कार्यालये, एटीएम-संलग्न शाखा आणि 'करन्सी चेस्ट्स' (रोख रकमेची साठवणूक करणारी केंद्रे) पूर्णपणे कार्यरत राहतील .बँक संघटनांनी पुकारलेल्या तीन दिवसांच्या देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक क्षेत्रातील 'स्टेट बँक ऑफ इंडिया' आणि 'इंडियन बँक' यांनी ग्राहकांना त्यांचे महत्त्वाचे व्यवहार आधीच पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स'ने तीन दिवसांच्या देशव्यापी संपाची हाक दिली आहे. प्रादेशिक ग्रामीण बँकांनीही या संपाला पाठिंबा दिला आहे. हा संप ३० सप्टेंबर रोजी होणाऱ्या खात्यांच्या सहामाही लेखासमाप्तीच्या कालावधीत होत आहे. यामुळे तिजोरीविषयक कामकाज धनादेश वटवण्याची प्रक्रिया आणि कॉर्पोरेट व्यवहार विस्कळीत होऊ शकतात. भारतीय रिझर्व्ह बँकेने २७ सप्टेंबर रोजी बँक शाखा, कार्यालये, एटीएमशी जोडलेल्या शाखा आणि करन्सी चेस्ट यांचे पूर्ण क्षमतेने कामकाज सुरू करण्यास मंजुरी दिली आहे.

# श्री संगम ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील कासारा दुमाला येथील श्री संगम ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता संस्थेच्या विद्यानगर, संगमनेर येथील कार्यालयात होणार आहे. संस्थेचे विद्यमान चेअरमन मा. श्री. किसन भाऊ हासे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होईल.

सभेत मागील दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे, दि. ३१ मार्च २०२६ अखेरचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करणे, संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे, सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे आदी विषयांवर चर्चा होणार आहे. तसेच सन




२०२५-२६ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे, सन २०२६-२७ साठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे, सन २०२४-२५ च्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे, संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांचे कर्ज जाहीर करणे, सभासद व कर्मचारी प्रशिक्षणाचे आयोजन आणि पोटनियम दुरुस्तीद्वारे संस्थेच्या कार्यक्षेत्रात वाढ करणे हे विषयही सभेपुढे ठेवण्यात आले आहेत.

संस्थेचे सन २०२५-२६ चे आर्थिक पत्रके कार्यालयात सभासदांसाठी उपलब्ध आहेत. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास अर्धा तास थांबून त्याच ठिकाणी सभेचे कामकाज पूर्ण केले जाईल, असे कळविण्यात आले आहे. यावेळी इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक मंडळाच्या आदेशावरून संस्थेचे व्यवस्थापक श्री. रावसाहेब सोन्याबापू हासे यांनी केले आहे.

# प्रा. डॉ. वि.ल धारूरकर यांना जीवन गौरव पुरस्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - रेडियंट टॅलेंट रेकॉर्ड्सच्या वतीने आयोजित २६ व्या अखिल भारतीय प्रतिभा संमेलनात प्रसिद्ध विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ व माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माध्यम शिक्षण, पत्रकारिता, इतिहास संशोधन, पुरातत्त्वविद्या, पर्यटन व उदार कला आदी क्षेत्रांत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या उल्लेखनीय संशोधनकार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



शिर्डी येथील हॉटेल पासोच्या सभागृहात आयोजित या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनानी नरवीर तानाजी मालुसरे यांचे अकरावे वंशज सुभेदार कुणाल मालुसरे होते. छत्तीसगडचे शिक्षणतज्ज्ञ, रायपूर येथील कला विद्यापीठाचे संस्थापक व सहकार भारतीचे माजी अध्यक्ष डॉ. राकेश मिश्रा यांच्या हस्ते डॉ. धारूरकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक ॲड. क्रांती महाजन यांनी केले. त्यांनी आतापर्यंतच्या २६ प्रतिभा संमेलनांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छत्रपती संभाजीनगर येथील प्रा. डॉ. पंढरीनाथ रोकडे यांनी केले.

यावेळी डॉ. धारूरकर यांनी लिहिलेल्या 'डॉ. हेडगेवार : जीवन एवं कार्य' या ग्रंथाचे डॉ. राकेश मिश्रा यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या संमेलनात कला, साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, समाजसेवा आदी विविध क्षेत्रांत राष्ट्रीय पातळीवर विधायक कार्य करणाऱ्या ३५ मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

समारंभात ड. क्रांती महाजन, डॉ. राकेश मिश्रा आणि डॉ. वि. ल. धारूरकर यांची मनोगते झाली. यावेळी भटिंडा (पंजाब) येथील सिंह ब्रा, शिर्डीचे उद्योजक खंडेराव कडलक, अमरावतीचे उद्योजक राजाभाऊ उंबरकर, संभाजीनगरचे सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव राम रुळे, जयराज कुटे, डॉ. रामदास सपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते. शेवटी सौ. रेखाताई पिंपराळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. विविध क्षेत्रांतील प्रतिभावंतांचा सन्मान आणि त्यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेणारे हे संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

# डॉ. अशोकराव ढगे यांच्याकडून दुष्काळग्रस्तांसाठी ५० हजारांची मदत



दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देत वैयक्तिक कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी ५० हजार रुपयांचा धनादेश अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सुपूर्द केला. शुक्रवारी (दि. २५ सप्टेंबर) नेवासा तालुका टंचाई आढावा बैठकीदरम्यान हा धनादेश सुपूर्द करण्यात आला. सध्या तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. ढगे यांनी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ही वैयक्तिक आर्थिक मदत दिली. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी, नगरपंचायत नगराध्यक्ष डॉ. करणसिंग घुले, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्यासह विविध अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# भगवती नांदूर येथे गुणवंतांचा भव्य सत्कार

## MPSC व पोलीस भरतीत घवघवीत यश; नऊ रत्ने शासकीय सेवेत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षा तसेच पोलीस भरती प्रक्रियेत भगवतीनांदूर येथील नऊ तरुण-तरुणींनी घवघवीत यश संपादन करून विविध शासकीय सेवांमध्ये निवड मिळवली आहे. या गुणवंतांच्या जिद्द, मेहनत आणि यशाचा गौरव करण्यासाठी रविवारी भगवतीनांदूर येथे भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

समस्त ग्रामस्थ भगवतीनांदूर-खंडरमाळ, भगवतीमाता विद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंद तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने हा कार्यक्रम रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता भगवतीमाता मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या शुभहस्ते अहिल्यानगरचे खासदार तथा भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजयदादा विखे पाटील उपस्थित राहणार असून, अध्यक्षस्थानी महाराष्ट्र टाइम्स पुणेचे उपसंपादक प्रशांत काशिनाथ आहेर राहणार आहेत. मुंबई पोलीस दलाचे डीसीपी डॉ. राजेंद्र निवृत्ती भुजबळ हे गुणवंतांना मार्गदर्शन करणार आहेत.

प्रमुख उपस्थितांमध्ये शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, अकोलेचे आमदार किरण लहामटे, संगमनेरचे आमदार अमोल खताळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष कपिलराव पवार, भाजपचे तालुकाध्यक्ष गुलाबराजे भोसले तसेच सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सागर यांचा समावेश आहे. या सोहळ्यात अमोल शशिकांत भागवत यांची महसूल सहाय्यक, मंत्रालय येथे, पल्लवी दत्तात्रय कान्होरे यांची मुद्रांक शुल्क अधिकारी व राज्य विक्रीकर अधिकारी म्हणून, मयूर भिमाजी करंजेकर यांची बीएमसी कार्यकारी सहाय्यक म्हणून, तर आकाश दत्तात्रय भागवत यांची महसूल सहाय्यक म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात येणार आहे.

तसेच ऋषिकेश विकास सुपेकर आणि विकास मनाजी मोरे यांची पोलीस उपनिरीक्षक म्हणून, ऋषभ यशवंत सुपेकर यांची पुणे पोलीस दलात, तर विजय प्रभाकर भोईटे आणि नुतन चंद्रकांत पवार यांची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याबद्दल गौरव करण्यात येणार आहे.

एकाच गावातील नऊ युवक-युवतींची मंत्रालय, महसूल विभाग, बीएमसी आणि पोलीस दलासह विविध शासकीय सेवांमध्ये निवड होणे ही भगवतीनांदूरसाठी अभिमानाची बाब आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, सातत्य आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर स्पर्धा परीक्षांमध्ये मिळवलेले हे यश परिसरातील इतर विद्यार्थी आणि युवकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. गुणवंतांच्या या यशामुळे भगवतीनांदूरच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली असून, त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी आयोजित या सोहळ्यास पंचक्रोशीतील ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक आणि युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरून - महाराष्ट्र सरकारचा...

मराठवाड्यातील लातूर, धाराशिव, जालना, छत्रपती संभाजीनगर तसेच विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील बहुतांश तालुक्यांचा या दुष्काळग्रस्त यादीत समावेश आहे.

शेतकऱ्यांच्या हाती काहीच उरले नाही; मुख्यमंत्र्यांची बांधावरील पाहणीनंतर घोषणा लातूर, धाराशिव आणि विदर्भातील दुष्काळी भागाचा प्रत्यक्ष दौरा केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना शेतकरी बांधवांना धीर दिला होता. आम्ही स्वतः बांधावर जाऊन पाहिले आहे. सोयाबीन, तूर, कापूस पूर्णपणे करपून गेले असून सोयाबीनला दाणा भरलेला नाही. शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडेल अशी परिस्थिती नाही. १९७२ नंतरचा हा सर्वात मोठा दुष्काळ असल्याचे शेतकरी सांगत आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले होते.

केंद्राचे पथक येईल आणि नंतर पाहणी करेल या प्रक्रियेची वाट न पाहता, राज्य शासन स्वतःच्या तिजोरीतून तातडीने पहिला शासन निर्णय काढत आहे. शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाऊ नये यासाठी दिवाळीपूर्वीच थेट आर्थिक मदत त्यांच्या बँक खात्यावर जमा केली जाईल, अशी स्पष्ट ग्वाही त्यांनी दिली होती.

## पान १ वरून - मुख्यमंत्री यांचा मोठा...

विविध सहकारी संस्था, धार्मिक व सामाजिक ट्रस्ट, उद्योग समूह, व्यापारी संघटना आणि सक्षम नागरिकांनीही आपल्या परीने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला तर संकटाची तीव्रता काही प्रमाणात कमी करता येऊ शकते. या संस्थांनी स्वतंत्रपणे किंवा शासनाच्या समन्वयाने 'शेतकरी दुष्काळ सहाय्यता निधी' उभारून त्यातून चारा, पिण्याचे पाणी, पशुधनासाठी मदत, शेतीसाठी आवश्यक साधने आणि गरजू कुटुंबांना तातडीचे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचा विचार करावा.

विशेषतः सहकारी साखर कारखाने आणि सहकारी संस्थांचा ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट संबंध आहे. शेतकरी टिकला तरच सहकार टिकेल आणि ग्रामीण बाजारपेठही सक्षम राहील. त्यामुळे या संस्थांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दुष्काळ निवारणासाठी निधी उपलब्ध करून दिल्यास त्याचा मोठा उपयोग होऊ शकतो. उद्योगपती आणि मोठ्या व्यावसायिक संस्थांनीही सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागासाठी मदत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

केंद्र आणि राज्य सरकारनेही परस्पर समन्वयाने मदतकार्य अधिक प्रभावी करण्याची गरज आहे. पिकांचे पंचनामे, नुकसानभरपाई, पीकविमा, कर्जाबाबत सवलती, चारा छावण्या, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा आणि आगामी रब्बी हंगामासाठी आवश्यक उपाययोजना याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. सरकारने केंद्राकडे मदतीसाठी आवश्यक माहिती पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली असल्याचेही सांगण्यात आले आहे.

शेतकरी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. शेती अडचणीत आली तर त्याचा परिणाम केवळ शेतकऱ्यांच्या कुटुंबावर होत नाही; ग्रामीण बाजारपेठ, व्यापार, सहकार, वाहतूक, उद्योग आणि एकूणच राज्याच्या अर्थचक्रावर त्याचे परिणाम जाणवतात. त्यामुळे आजची गरज ही एकमेकांवर दोषारोप करण्याची नसून संकटग्रस्त शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहण्याची आहे.

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## आ. अमोल खताळ यांच्या पुढाकारातून सलग तिसऱ्या वर्षी गणेश मंडळांसाठी स्वागत कक्ष



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने संगमनेर शहरात निघालेल्या गणेश विसर्जन मिरवणुकीत उत्साह, भक्तिभाव आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. शहरातील विविध गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशा जयघोषात लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकारातून सलग तिसऱ्या वर्षी उभारण्यात आलेल्या स्वागत कक्षात शहरातील विविध गणेश मंडळांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. प्रत्येक मंडळाला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे, आमदार खताळ यांनी स्वतः ढोलवादनात सहभाग घेत गणेशभक्तांचा उत्साह वाढविला.

आमदार खताळ यांच्या पुढाकारातून दरवर्षी गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या गणेश मंडळांसाठी स्वागत कक्ष उभारण्यात येतो. यंदा या उपक्रमाचे तिसरे वर्ष होते. या स्वागत कक्षाला शहरातील अनेक गणेश मंडळांनी भेट देत सहभाग नोंदविला. मिरवणुकीत सहभागी झालेल्या प्रत्येक गणेश मंडळाचे आमदार खताळ यांनी स्वतः स्वागत केले. मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा आणि कार्यकर्त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. गणेश मंडळांचे स्वागत करताना आमदार खताळ यांनी स्वतः ढोल वाजवत मिरवणुकीच्या उत्साहात सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या गजरात त्यांनी मनमुराद आनंद लुटला. त्यांच्या ढोलवादनामुळे स्वागत कक्ष परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गणेशभक्तांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरा जपणारा उत्सव व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी वर्षभर केलेल्या सामाजिक आणि धार्मिक कार्याचा सन्मान करण्याच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दरम्यान, विसर्जन मिरवणुकीत शहरातील विविध भागांतील गणेश मंडळे पारंपरिक वाद्यांच्या गजरात सहभागी झाली होती. ढोल-ताशांचा निनाद, गणेशभक्तांचा उत्साह आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सलग तिसऱ्या वर्षी राबविण्यात आलेल्या स्वागत उपक्रमामुळे गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या मंडळांचा सन्मान करण्याची ही परंपरा पुढील काळातही सुरू ठेवण्याचा मानस असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

## एसआयआरवरून निवडणूक आयोगाविरोधात तीव्र संघर्ष



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

एसआयआर प्रक्रिया आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात कॉक्रोच जनता पार्टीने आक्रमक भूमिका घेतली आहे. कॉक्रोच जनता पार्टीने थेट आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. कॉक्रोच जनता पार्टीने ज्ञानेश कुमार यांना ४८ तासांचा अल्टिमेटम दिला होता. या अल्टिमेटमचा आज शेवटचा दिवस आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या या इशाऱ्यानंतर ज्ञानेश कुमार काय भूमिका घेतात, याकडे साऱ्यांचे लक्ष लागलं आहे.कॉक्रोच जनता पार्टीने म्हटलं की, सरफ़रोशी की तमन्ना अब हमारे दिल में है, देखना है ज़ोर कितना बाज़ुए-क़ातिल में है. तुम्ही तयारीला लागा. आता २ ऑक्टोबर रोजी भेटू'. कॉक्रोच जनता पार्टीने ४८ तासांचा अल्टिमेटम ज्ञानेश कुमार यांना दिला होता. त्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीने २ ऑक्टोबर रोजी म्हणजे महात्मा गांधींच्या जयंतीचं औचित्य साधून आंदोलनाची घोषणा केली आहे. यानंतर केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी म्हटलं की, निवडणूक आयोगावर आरोप होत असेल, आयोगाने त्यांची बाजू मांडली पाहिजे'.इंडियन एक्स्प्रेसच्या एका रिपोर्टनुसार, मागील १० महिन्यात दोन निवडणूक आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांनी घेतलेल्या निर्णयांवर आक्षेप घेतला, परंतु त्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. या रिपोर्टनंतर काँग्रेस पक्षसह सर्व विरोधी पक्ष देखील आक्रमक झाले आहेत. देशातील विविध भागात ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली जात आहे. देशातील मुख्य शहरात निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चे काढले जात आहे. आंदोलनादरम्यान पोलिसांनी कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं आहे.कॉक्रोच जनता पार्टीने आता निवडणूक आयोग दुरूस्त करा, अशी मोहीम हाती घेतली आहे. अभिजीत दिपके, सौरभ दास, आशुतोष रांका यांनी आरोप केला आहे की, एसआयआर प्रक्रियेद्वारे ३० राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील १३ कोटींहून अधिक नावे वगळण्यात आली आहे. मतदार यादीतून वगळण्यात आलेले प्रत्येक नाव कायदेशीर, पारदर्शक प्रक्रियेद्वारे वगळण्यात आले आहे, हे निवडणूक आयोगाने सिद्ध करावे, अशी मागणी सीजीपीने केली आहे. त्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची देखील मागणी केली आहे.

## प्रा. योगेश चिकणे यांना संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विषयात पीएच.डी.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर येथील डॉ. योगेश रामदास चिकणे यांनी संगणक विज्ञान व अभियांत्रिकी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत ओरिएंटल युनिव्हर्सिटी, इंदोर येथून पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. Preserving the Privacy of Chronic Big Data in Fog and Cloud Environment या विषयावर त्यांनी संशोधन केले.



डॉ. योगेश चिकणे यांनी फॉग कम्प्युटिंग आणि क्लाउड कम्प्युटिंग वातावरणामध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या डेटाची गोपनीयता आणि सुरक्षितता जपण्याच्या दृष्टीने आपल्या संशोधनातून महत्त्वपूर्ण अभ्यास केला आहे. डॉ. योगेश चिकणे यांना शिक्षण क्षेत्रातील १८ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. अध्यापनासोबतच संशोधन क्षेत्रातही त्यांनी सातत्यपूर्ण योगदान दिले आहे. पीएच.डी.च्या संशोधन काळात त्यांनी २ स्कोपस जर्नल्स, २ स्कोपस अनुक्रमित आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन कार्य आणि २ आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये संशोधन लेख प्रकाशित केले आहेत.

त्यांच्या संशोधन कार्यामध्ये बिग डेटा, फॉग कम्प्युटिंग, क्लाउड कम्प्युटिंग आणि डेटा प्रायव्हसी यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित विषयांचा समावेश आहे. डॉ. योगेश चिकणे यांच्या संशोधन प्रवासात डॉ. ममता मीना यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कुलगुरू डॉ. ध्रुव घई, प्र-कुलगुरू डॉ. अमोल गोरे आणि शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. गरिमा घई, अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र सिंग विभागप्रमुख डॉ. अतुल अगरवाल यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभल्याचे डॉ. चिकणे यांनी सांगितले.

अध्यापन, संशोधन आणि आधुनिक संगणक तंत्रज्ञान या तिन्ही क्षेत्रांचा समन्वय साधत डॉ. योगेश चिकणे यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे. त्यांच्या पुढील संशोधन कार्यासाठीही शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## १ ऑक्टोबरपासून एसटीचा सवलत प्रवास डिजिटल

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ( एसटी ) विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबर २०२६ पासून NCMC कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. सवलतीचे तिकीट देताना NCMC कार्डचा वापर करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असून, त्यासाठी कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया राज्यभरातील आगार आणि बसस्थानकांवर सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती NCMC ने अधिकृत एक्स पोस्टच्या मार्फत दिली.१ ऑक्टोबरपासून सवलतीचे तिकीट NCMC कार्डमधूनच वितरित केले जाणारएसटी महामंडळाकडून विविध सामाजिक घटकांना शासन निर्देशानुसार सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते. त्यामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना मिळणाऱ्या सवलतीचा समावेश आहे. या सवलतीच्या प्रवासाचे अधिक सुलभ आणि डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी NCMC कार्ड प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. १ ऑक्टोबरपासून सवलतीचे तिकीट NCMC कार्डमधूनच वितरित केले जाणार आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारक प्रवाशांनी त्यापूर्वीNCMC कार्डची नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. ज्या प्रवाशांकडे कार्यरत NCMC कार्ड आहे किंवा कार्ड नोंदणी केल्याची QR कोड असलेली पावती आहे, त्यांना सवलतीचा लाभ मिळणार आहे. अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला सवलतधारक प्रवाशांना NCMC कार्ड नोंदणी केल्यानंतर मिळालेली QR कोडयुक्त पावती वाहकाच्या ईटीएम मशीनवर स्कॅन करून सवलतीचे तिकीट घेता येणार आहे. ह न घेण्याचे

**नोकरीची सुवर्णसंधी**

**'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'**

**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

**पदे: Field Sales Executive**
**Business Development Manager**

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

**पात्रता**
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

**सुविधा**
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा


संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165










दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

# प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे डी. लिट. पदवीने सन्मानित

छ. संभाजीनगर (वृत्तसंस्था)-

ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक आणि संशोधक डॉ. आ. ह. साळुंखे यांना महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने ज्ञानक्षेत्रातील मानाची डी.लिट. पदवी प्रदान करण्यात आली. विद्यापीठाच्या वतीने शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी आयोजित दीक्षांत समारंभात त्यांचा हा सन्मान करण्यात आला.



डॉ. आ. ह. साळुंखे यांनी गेल्या अनेक दशकांपासून भारतीय समाज, संस्कृती, इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान आणि बहुजन विचारपरंपरेचा सखोल अभ्यास केला आहे. विविध सामाजिक आणि वैचारिक विषयांवर त्यांनी सातत्याने लेखन व संशोधन करत आपली स्वतंत्र वैचारिक ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या प्रदीर्घ साहित्यिक प्रवासात ६५ ग्रंथांची निर्मिती झाली आहे. चार्वाक तत्त्वज्ञान, बळी परंपरा, बौद्ध विचार, संत साहित्य, स्त्रीविषयक प्रश्न, जातिव्यवस्था तसेच वैदिक विचारपरंपरेचे चिकित्सक विश्लेषण या विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. 'आस्तिक शिरोमणी चार्वाक', 'विद्रोही तुकाराम', 'बळीवंश', 'मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती', 'महाभारतातील स्त्रिया', 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' आणि 'सर्वोत्तम भूमिपुत्र गोतम बुद्ध' यांसारख्या त्यांच्या ग्रंथांची वैचारिक क्षेत्रात मोठी चर्चा झाली आहे.

लेखनासोबतच महाराष्ट्रभर हजारो व्याख्यानांच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक विषयांवर त्यांनी मांडलेले विचार समाजात व्यापक चर्चेचा विषय ठरले. डॉ. साळुंखे यांच्या प्रदीर्घ संशोधनकार्याची, विपुल साहित्यनिर्मितीची आणि वैचारिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत विद्यापीठाने त्यांना डी.लिट. पदवीने सन्मानित केले. या सन्मानामुळे त्यांच्या दीर्घ वैचारिक आणि साहित्यिक कार्याचा गौरव झाला आहे. दीक्षांत समारंभात डॉ. साळुंखे यांच्या साहित्यिक, संशोधनात्मक आणि वैचारिक कार्याचा विशेष गौरव करण्यात आला. त्यांच्या लेखनातून समाजातील विविध प्रश्नांकडे चिकित्सक आणि तर्कशुद्ध दृष्टिकोनातून पाहण्याची भूमिका सातत्याने मांडली गेली आहे.

त्यांच्या वैचारिक योगदानामुळे मराठी साहित्य आणि सामाजिक विचारविश्व समृद्ध झाले असून, नव्या पिढीतील अभ्यासक व वाचकांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरले आहे.

# राम मंदिरातील लुटीविरोधात SIT कडून आरोपपत्र दाखल

आयोध्या (वृत्तसंस्था)

अयोध्या येथील राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणी डखढ ने तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणात अटक केलेल्या आठ आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टशी संबंधित असलेले चंपत राय, अनिल मिश्रा आणि गोपाल राव यांना तपासात निर्दोष ठरवण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणात एकूण १३३ साक्षीदारांची नावे दिली आहेत. देणगी चोरीप्रकरणी एफआयआर दाखल करणारे कृष्ण मोहन हे या प्रकरणातील पहिले साक्षीदार आहेत. चंपत राय, अनिल मिश्रा आणि गोपाल राव यांचाही साक्षीदारांमध्ये समावेश आहे. कोतवाली निरीक्षक, राम जन्मभूमी पोलीस ठाण्याचे निरीक्षक आणि अयोध्या पोलीस प्रमुख यांच्यासह एकूण २७ पोलीस कर्मचाऱ्यांचीही या प्रकरणात साक्षीदार म्हणून नावे देण्यात आली आहेत. सीसीटीव्ही फुटेज, जप्त केलेली रक्कम, बँक खात्याची कागदपत्रे आणि साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे पोलिसांनी आठ आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल करून तपास पूर्ण केला आहे. पोलिसांच्या तपासात सीसीटीव्ही फुटेज महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून समोर आले आहे. तपासानुसार, आरोपी अविनाश शुक्ला हा देणगी चोरताना सर्वाधिक वेळा पकडला गेला होता. पोलिसांचा दावा आहे की, अविनाश सीसीटीव्हीमध्ये ८५ वेळा चोरी करताना आणि चार वेळा चोरीत मदत करताना पकडला गेला. आरोपी करुणेश पांडेवर स्वतः दोनदा चोरी केल्याचा आणि ६८ वेळा चोरीत मदत केल्याचा आरोप आहे. लव कुश मिश्रा एकदा चोरी केल्याबद्दल आणि ५२ वेळा चोरीत मदत केल्याबद्दल दोषी आढळला. अनुकल्प मिश्रावर ५६ वेळा चोरीत मदत केल्याचा आरोप आहे, तर रामाशंकर मिश्रावर एकदा चोरी केल्याचा आरोप आहे. रामाशंकर यादव उर्फ टिन्नू यादवचा भाचा मनीष यादव, एप्रिल २०२६ मध्ये कामावर रुजू झाला होता. तपासानुसार, मनीषने १५ एप्रिल ते ३ जून दरम्यान स्वतः १६ वेळा चोरी केली आणि इतर आरोपींना १९ वेळा मदत केली.

# हेक्टरी १ लाख द्या, अन्यथा २८ सप्टेंबरला राज्यभरात हल्लाबोल - रविकांत तुपकर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राज्य सरकारने महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांमध्ये (७५ टक्के भागात) कोरडा दुष्काळ जाहीर केल्यानंतर शेतकरी वर्गातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रमुख रविकांत तुपकर यांनी सरकारच्या या घोषणेवर घणाघाती टीका करत शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजनांना तकलादू आणि कोरड्या अशी संज्ञा दिली आहे. दुष्काळ जाहीर करून सरकारने कोणताही मोठा पराक्रम केलेला नाही. १०-२० रुपयांचा शेतसारा आणि परीक्षा फी माफ करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे. शेतकऱ्यांना जगायचे असेल, तर हेक्टरी मर्यादेची अट न घालता थेट हेक्टरी १ लाख रुपयांची थेट आर्थिक मदत बँक खात्यात जमा करावी; अन्यथा येत्या सोमवारी, २८ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यभरातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर तीव्र 'हल्लाबोल' आंदोलन छेडले जाईल, असा निर्वाणीचा इशारा तुपकर यांनी दिला आहे.

शासनाच्या दुष्काळी जीआरमधील १२ मुद्द्यांवर बोट ठेवत रविकांत तुपकर यांनी सरकारच्या मदतीची पोलखोल केली. सरकार सांगते आम्ही विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ केली; म्हणजे २००, ३०० किंवा ५०० रुपयांची सूट दिली. शेतसाऱ्यात सूट दिली; म्हणजे शेतकऱ्याचे अवघे १० ते २० रुपये वाचणार. या तुटपुंज्या सवलतींनी मरणपंथाला लागलेला शेतकरी जगणार आहे का?शेतकऱ्यांचे पीक कर्ज पुनर्गठित करणार असल्याचे शासन सांगत आहे. मुळात आम्ही आधीच कर्जमाफीच्या निकषांत बसलो असून कर्जमाफीस पात्र आहोत. त्यामुळे आमचे कर्ज पुनर्गठित करून आम्हाला पुन्हा व्याजाच्या खाईत ढकलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शेतीपंपांच्या चालू वीजबिलाला स्थगिती देण्याची घोषणा केवळ कागदी आहे, कारण वीजबिलाला आधीच स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे जुन्याच गोष्टी नव्या पॅकेजमध्ये गुंडाळून शासन शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक करत आहे.

# कै. प्रभाकरराव भोर यांचा ३६ वा पुण्यस्मरण सोहळा साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

स्व. प्रभाकरराव रामचंद्र भोर साहेब सेवाभावी मंडळ, आंबी माळेगाव, प्रभाकरराव भोर विद्यालय, आंबी खालसा आणि समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त

विद्यमाने आदरणीय स्व. प्रभाकरराव रामचंद्र भोर साहेब यांच्या ३६ व्या पुण्यस्मरण सोहळ्याचे औचित्य साधून विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा अत्यंत भावपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व श्री. भाऊशेठ कहाणे होते. कार्यक्रमाची सुरुवात स्व. प्रभाकरराव भोर साहेब स्व. भाऊसाहेब थोरात दादा तसेच स्व. तुळशीनाथ अण्णा भोर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व आदरांजली वाहून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. शशांक खोजे सर यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी स्व. प्रभाकरराव भोर साहेब यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा आणि विचारांचा आढावा घेतला. तसेच शाळेची प्रगती आणि सर्व शालेय परिस्थितीचा लेखाजोखा मांडला. प्रसंगी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक श्री. नानासाहेब भोर सर यांनी अत्यंत सुटसुटीत आणि अभ्यासू शैलीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.इयत्ता १० वी च्या विद्यार्थिनींनी सुंदर ईशस्तवन आणि स्वागतगीत सादर केले.त्यानंतर



शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यात आरुषी कहाणे, आरोही गगे, अलीना शेख,बिस्मिल्ला शेख, अपूर्वा ढोकरे, दिव्या गाडेकर, अश्विनी कहाणे, सुहान शेख यांनी स्व. भोरसाहेब तसेच आदरणीय दादा आणि स्व.तुळशीनाथ भोर यांच्या जीवनकार्यावर, त्यांच्या विचारांवर आणि संस्कारांवर मनोगते व्यक्त करणारी उत्कृष्ट भाषणे केली. विद्यार्थ्यांच्या प्रभावी भाषणांचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले.तसेच श्री.सुरेशशेठ कान्होरे, सरपंच श्री.बाळासाहेब ढोले,श्री सर्जेराव पाटील ढमढेरे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच आ. स्व. प्रभाकरराव भोर साहेब यांचे चिरंजीव श्री. महेंद्र शेठ भोर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या तर्फे विद्यालयातील एका गरीब, होतकरू , हुशार विद्यार्थिनी कु वैष्णवी विकास वाघ हिला शालोपयोगी साहित्याची भेट देण्यात आली.या प्रसंगी विविध समित्यांचे पदाधिकारी, विविध संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी संघ, पालक, आंबी खालसा, माळेगाव पठार परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# मंडप हटवला, आंदोलन नाही; जरांगेंचा सरकारला इशारा

जालना (वृत्तसंस्था)


मराठा आरक्षणाच्या लढ्याचे केंद्रबिंदू ठरलेल्या जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणासाठी उभारण्यात आलेला मंडप आणि व्यासपीठ अवघ्या काही तासात हटवण्यात आले आहे. २९ ऑगस्ट २०२३ पासून म्हणजेच तब्बल ३ वर्षे २७ दिवस अखंड उभा असलेला हा मंडप ग्रामस्थ आणि सरपंचांच्या निर्णयानंतर काढण्यात आला आहे. अंतरवाली सराटी गावचे सरपंच आणि मनोज जरांगे यांची स्थानिक कोर कमिटी यांच्यात झालेल्या संवादानंतर हा मंडप काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मिळत आहे. मागील काही दिवसांपासून ग्रामस्थांमध्ये या मंडपावरून कुजबूज ऐकायला मिळत होती. या सर्व घडामोडींवर आता स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.



मनोज जरांगे पाटील म्हणाले की, या आंदोलनात अंतरवाली येथील शेवटचं आंदोलन असा शब्द वापरला आहे. अंतरवाली येथील व्यासपीठ आणि सर्व साहित्य आता काढले आहे. आता सरकारने केले नाही तर इथून पुढे पाटोदापासून पुढे आंदोलन होईल. ग्रामसभा आणि आंदोलनाचा काहीही संबंध नाही. राज्यात कुठेही आंदोलन होऊ शकतं. आंदोलन राज्यात येवला असो किंवा अंतरवाली कुठेही होऊ शकते, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिलीय.मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की,यावर आधी विरोध झाला आहे. ग्रामसभा घेऊन ठराव देखील झाला आहे. मात्र मी थांबलो नाही. आंदोलन येवला आणि परळी गावातील कुठल्याही गावात होऊ शकते. पश्चिम महाराष्ट्रातही आंदोलन होऊ शकते, मी थांबलो नाही, आंदोलन सुरू आहे. यापुढे अंतरवाली येथे आंदोलन होणार नाही. अंतरवाली येथील हे शेवटचे आंदोलन होते. ३ वर्षे ते गाव काढले आहे. तेथील लोकांनी रक्त सांडले आहे. ओबीसी बांधवांनी शेती दिली, त्या सर्व गावकऱ्यांचा मी आभारी आहे. आता पुढे पाटोदापर्यंत आंदोलन गेले आहे. ३ महिन्यात केले नाही तर पुढे मुंबईकडे जाऊ, असा इशारा देखील त्यांनी दिला.

दरम्यान, राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. याबाबत विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले की, सरकारने दुष्काळ जाहीर करताना सरसकट जाहीर करायला पाहिजे, अर्धवट करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसू नये. कर्जमाफी, अनुदान पूर्णपणे १०० टक्के करणे गरजेचे आहे. तसे आता सरकारने जाहीर करावे, हेक्टरी ८० ते ९० हजार ते १ लाख रुपये नुकसानभरपाई मिळावी. सरकारने पाणी, चाऱ्याची देखील व्यवस्था तातडीने करावी, असे त्यांनी म्हटले.

आरक्षणाच्या लढ्यात काही लोकांनी केलेल्या अडथळ्यांवर आणि बदनामीवर जरांगे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. तीन वर्ष झालं खूप घाण कचरा झाला होता, तो पण थोडा आता काढावा लागेल. समाजाच्या गोरगरिबांच्या लेकरांसाठी काम करतोय म्हणून तुम्ही आम्हाला इतका त्रास देणार का? आम्ही तीन वर्षे सहन केलं हो. आता हा घाण कचरा काढू द्या. खूप मस्तवालून गेलेत हे लोक. आमच्यावर आंदोलनाची जबाबदारी असल्यामुळे आम्ही संयम बाळगला. पण आता आरक्षण कुठेच जात नाही आणि जाऊन पण देत नाही. मात्र ही तीन वर्षांची बुळबुळ आणि घाण काढावीच लागेल, असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला.




# निवडणूक आयोगाविरोधात ठाकरे बंधूंचा मोर्चा

मुंबई (वृत्तसंस्था)


केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वादग्रस्त ठरलेल्या 'विशेष सघन पुनरीक्षण' प्रक्रियेवरून आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यशैलीवरून देशभरात संतापाची लाट उसळलेली असतानाच, महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत ऐतिहासिक आणि राजकीय भूकंप घडवणारी घडामोड समोर आली आहे. निवडणूक आयोगाने मतदारांची घोर फसवणूक केल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकत्र येत निर्णायक संघर्षाचे रणशिंग फुंकले आहे.



येत्या ४ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईत मनसे आणि शिवसेनेच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'जनमोर्चा' काढण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा राज ठाकरे यांनी सोशल मीडियाद्वारे केली आहे. दोन्ही ठाकरे बंधूंच्या संयुक्त स्वाक्षरीने/नावाने हे आवाहन समोर आल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

आपल्या अधिकृत संदेशात राज ठाकरे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर थेट बोट ठेवले आहे. देशातील सत्ताधारी पक्षाची जणू काही आपण एक शाखाच आहोत, अशा लाचार पद्धतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील निवडणूक आयोग वागत आहे. 'एसआयआर'च्या (डखठ) नावाखाली कोट्यवधी मतदारांची नावे पद्धतशीरपणे वगळून जनतेची अक्षम्य फसवणूक करण्यात आली आहे. हा लढा केवळ राजकीय अस्तित्वाचा नसून देशातील लोकशाही, निष्पक्ष निवडणूक व्यवस्था आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान वाचवण्यासाठीचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.या मोर्चाची व्याप्ती आणि राजकीय स्वरूप स्पष्ट करताना राज ठाकरे म्हणाले, या मोर्चाच्या आयोजनात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेनेचा (णइढ) पुढाकार असला, तरी हा कोणत्याही एका पक्षाचा मोर्चा नसून तमाम जनतेचा आक्रोश आहे. हा मोर्चा संपूर्ण राजकीय व्यवस्थेचा आणि सामान्य नागरिकांचा बुलंद आवाज ठरावा,




महाराष्ट्राला
महान राष्ट्र
बनविण्याचा
ध्यास घेतलेला
तरुण नेता
आ.सत्यजितजी तांबे
सदस्य, विधानपरीषद, महाराष्ट्र यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
-शुभेच्छुक-
मा. प्रविण आव्हाड
संगमनेर तालुका अध्यक्ष
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) आंबेडकर